# इयत्ता : बारावी [ STD. XII] : मराठी (109) [ Marathi ]
## प्रथम सत्र नमुना प्रश्न-पत्रिका : 2021- 22 [Sample paper : 2021- 22 ]

**एकूण गुण : 40**

महत्त्वाच्या सूचना :
1. या प्रश्नपत्रिकेसाठी एकूण गुण 40 गुण असून 90 मिनिटांचा कालावधी आहे.
2.एकूण 50 बहुपर्यायी प्रश्न (MCQ) आहेत.
3. या प्रश्नपत्रिकेत अ [वाचन व आकलन], ब [व्याकरण], क [गद्य-पद्य पाठ] असे तीन विभाग आहेत.
4.प्रत्येक विभागापूर्वी दिलेल्या विकल्पानुसार यापैकी 40 प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.
5. यासाठी प्रत्येक विभागापूर्वी दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात
6.प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार (4) पर्याय आहेत. यापैकी योग्य पर्याय निवडून आपले उत्तर नोंदवावे / द्यावे.
7.प्रत्येक प्रश्नाच्या योग्य पर्यायासह उत्तरासाठी एक (1) गुण आहे.
8. प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली जाईल.

## विभाग अ : वाचन व आकलन : गुण 10

प्रश्न क्रमांक 1 ते 6 साठी सूचना – पुढील अपठीत गद्य उतारा वाचून त्या आधारे विचारलेल्या 6 प्रश्नांपैकी कोणत्यही 5 प्रश्नांची उत्तरे द्या.

'घर' या दोन अक्षरांत प्रचंड शक्ती आहे. केवळ चार भिंती आणि डोक्यावर छप्पर म्हणजे घर नव्हे. घर म्हणजे उंच इमारत आणि महागड्या आणि निर्जीव वस्तूंनी सजलेली वास्तू नाही. घर बनते त्या घरात राहणाऱ्या व्यक्तींच्या एकमेकांशी जोडलेल्या प्रेमाच्या धाग्यांनी. घर म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा या देहाच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करण्याबरोबरच आपल्या मनावर संस्कार करणारी एक संस्था आहे. कोणत्याही व्यक्तीसाठी हे घरचे संस्कार पुढे बाहेरच्या जगात पाउल टाकताना फार महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

पूर्वीची घरे माणसांनी गजबजलेली असायची,सण-उत्सवाचा आनंद सारे मिळून लुटायचे. लहानांपासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वच एकमेकांच्या सहवासात प्रेमाने, आपुलकीने बांधलेली असत. घराची कवाडे येणाऱ्यांच्या स्वागतासाठी उत्सुक असत. पण आज काळ बदलला. जीवघेण्या स्पर्धेने जीवनाला एक गती मिळाली. दिखाऊ प्रतिष्ठेच्या गरजा वाढल्या.घरात जित्याजागत्या माणसाऐवजी निर्जीव वस्तूंचे महत्त्व वाढले.मुलांसाठी वेळ न देऊ शकणारे आई-बाप किमती वस्तू देऊन आपले प्रेम व्यक्त करू लागले. आजी– आजोबा, काका-काकू, भावंडे अशांच्या सहवासाला पारखी झालेली मुले कार्टूनच्या आभासी जगात हरवली. वृद्धाश्रमाच्या संख्येत वाढ झाली. 'घर'कोलमडले.फक्त निवारा राहिला.

**प्रश्न** : वाचलेल्या उताऱ्याच्या आधारे अचूक पर्याय निवडून उत्तरे द्या. **(5)**

1) घर म्हणजे ........
1] महागड्या वस्तूंनी सजलेली वास्तू.
2] एकत्र राहणारी, प्रेमाने बांधलेली माणसे
3] चार भिंती आणि वर छप्पर
4] उंच इमारत.

2) 'घर' ही संस्था आहे ...
1]संस्काराची 2] शिक्षणाची
3] राहण्या-जेवण्याची 4] शक्तीची

3) पूर्वी घराची दारे कशासाठी उत्सुक होती ?
1] सण-उत्सवासाठी 2] आई वडिलांसाठी
3] गजबजण्यासाठी 4] येणाऱ्यांच्या स्वागतासाठी

4) घरातून मिळालेली कोणती गोष्ट बाहेरच्या जगात महत्त्वाची ठरते.
1] भावंडांचे प्रेम 2] संस्कार
3] शिक्षण 4] सोयी-सुविधा

5)'घर कोलमडले, फक्त निवारा राहिला' असे म्हटले, कारण ..........
1] नात्यांमधील प्रेम जपले जाते..
2] वाढलेल्या सजावटीच्या वस्तूंमुळे माणसांना जागा कमी पडते.
3] नात्यांमधील प्रेमाऐवजी वेळ आणि दिखाऊ प्रतिष्ठेला महत्त्व आले.
4] घरे लहान झाली.

6)उताऱ्यातील 'कवाडे' या शब्दाचा समानार्थी शब्द आहे ....
1]अंगण 2] दारे
3] घरातील वडील माणसे 4]लहान मुले

<u>प्रश्न क्रमांक 7 ते 11 साठी सूचना</u> - <u>उपयोजित मराठी' मधील</u> पुढील उतारा वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

... कोणताही व्यवहार करताना आता लोकांना संबंधित व्यवहाराची सखोल माहिती, बारीकसारीक तपशील हवा असतो. हा तपशील घरबसल्या लिखित स्वरुपात मिळाला तर लोकांना ते हवेच असते. त्यातलाच एक प्रभावी मार्ग आहे 'माहितीपत्रक'. एकप्रकारे आपली उत्पादने, सेवा, संस्था लोकांपर्यंत पोहोचवण्याचे हे एक साधन आहे. जनमत आकर्षित करण्यासाठी ते लिखित स्वरूपाचे जाहीर आवाहन असते. नवी बाजारपेठ काबीज करण्याची ती पहिली पायरी आहे. माहितीपत्रक कमी वेळात कमी खर्चात ग्राहकांपर्यंत घरबसल्या पोहोचवता येते. हे माहितीपत्रक अप्रत्यक्षपणे जाहिरातीचे काम करते. अशा माहितीपत्रकात माहितीलाच जास्त प्राधान्य दिले जाते. ज्या हेतूने माहितीपत्रकात तयार केले त्या हेतूशी सुसंगत, अचूक माहिती दिली गेली पाहिजे. ही माहिती वस्तुनिष्ठ, वास्तव,सत्य व असली पाहिजे. अतिशयोक्त, चुकीची माहिती असता कामा नये. ती वाचनीयही असली पाहिजे.अर्थात यासाठी त्यातील भाषा आकर्षक व वेधक असली पाहिजे, पाल्हाळीक भाषाशैली नको.
माहितीपत्रक वेगळे वैशिष्ठ्यपूर्ण कसे असेल याची काळजी घेतली पाहिजे. यासाठी मांडणी आकर्षक, त्याचा कागद दर्जेदार, छपाई रंगीत असावी. या साठी कुशल कलाकार, चित्रकार, संगणकतज्ञ यांची मदत घेणे ही आवश्यक आहे.

**प्रश्न** : वाचलेल्या वरील उताऱ्याधारे अचूक पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या. **(5)**

7) आज माहितीपत्रकाची आवश्यकता वाटते ती .....
1] सखोल माहितीसाठी
2] पूर्ण तपशील मिळण्यासाठी.
3] लिखित माहिती घरबसल्या मिळण्यासाठी.
4] वरील सर्व कारणांसाठी .

8) पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
1] लोकांना माहितीपत्रकाची आवश्यकता असते.
2] महितीपत्रक म्हणजे बाजारपेठ काबीज करण्याची अंतिम पायरी
3] महितीपत्रक म्हणजे अप्रत्यक्षपणे जाहिरात.
4] सेवा,संस्था,उत्पादन याची लोकांना महिती देण्याचा प्रभावी मार्ग.

9) माहितीपत्रकातील माहिती अशी असावी ........
1] वस्तुनिष्ठ व अचूक 2] अतिशयोक्तीपूर्ण
3] अवास्तव 4] अपूर्ण

10)माहितीपत्रक वैशिष्ठ्यपूर्ण असावे यासाठी .........
1] दर्जेदार कागद 2] आकर्षक मांडणी
3] रंगीत छपाई 4] वरील सर्वच

11) माहितीपत्रकाची भाषा अशी नसावी ...
1] थोडक्यात पण महत्त्वाचे सांगणारी 2] वाचनीय
3] पाल्हाळीक 4] आकर्षक व वेधक

## विभाग ब : व्याकरण : गुण 10

<u>प्रश्न क्रमांक 12 ते 26</u> या <u>15प्रश्नांपैकी कोणत्याही 10 प्रश्नांची</u> उत्तरे द्या. **(10)**

12)पुढीलपैकी कोणता शब्द स्त्रीलिंगी आहे ?

1] कीर्ती 2] यश 3] देह 4] तोरण

13) पुढीलपैकी कोणता शब्द नपुसकलिंगी आहे ?

1] व्यवहार 2] माती 3] सौंदर्य 4] झरा

14)पुढीलपैकी कोणता शब्द पुल्लिंगी आहे ?

1] खुर्ची 2] आनंद 3] मंदिर 4] फूल

15) पुढीलपैकी कोणता शब्द अनेकवचनी आहे ?

1] परमेश्वर 2] किल्ला 3] खुर्ची 4] सवयी

16) पुढीलपैकी कोणता शब्द एकवचनी नाही ?

1] माऊली 2] विहिर 3] बियाणं 4] बेट

17) 'ज्ञान' या शब्दाचे अनेकवचनी रूप होईल ... .

1] ज्ञाना 2] ज्ञान 3] ज्ञाने 4] ज्ञानिया

18) 'सकाळी फिरायला जाणे आरोग्यास हितकारक आहे.' या वाक्याचा प्रकार आहे ....

1] नकारार्थी 2] विद्यर्थी 3] विधानार्थी 4] प्रश्नार्थी

19)पुढील वाक्यांपैकी आज्ञार्थ वाक्य आहे .....

1] आपला परिसर नेहमी स्वच्छ ठेवा.

2] आपला परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा.

3] आपला परिसर नेहमी स्वच्छ ठेवतो

4] किती स्वच्छ ठेवतो आपला परिसर नेहमी !

20)''हळू चालवतात का ही मुलं वाहनं!' - हे वाक्य या प्रकारचे आहे ....

1] प्रश्नार्थी 2] उद्गारार्थी 3] विधानार्थी 4] स्वार्थी

21)'किती मनापासून हसतात ती लहान मुलं !' – या वाक्याचे विधानार्थी वाक्य आहे .....

1] ती लहान मुलं खूप मनापासून हसतात.

2] ती लहान मुलं मनापासून हसतात का ?

3] त्या लहान मुलांनी खूप मनापासून हसावे .

4] लहान मुलांनो मनापासून हसा.

22) आईला कधीतरी सुट्टी मिळावी. – हे वाक्य आहे ......

1] आज्ञार्थी 2] विद्यर्थी 3] प्रश्नार्थी 4] होकारार्थी

23)'<u>प्रतिक्षण</u> मोलाचा आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा समास आहे ..

1] द्वंद्व समास 2] अव्ययीभाव समास

3] द्विगु समास 4] विभक्ती तत्पुरुष

24)'सूर्यास्त' – या सामासिक शब्दाचा समास आहे .......

1] अव्ययीभाव समास 2] कर्मधारय समास

3] द्वंद्व समास 4] विभक्ती तत्पुरुष समास

25) 'झुणकाभाकर' – या सामासिक शब्दाचा समास आहे .......

1] द्वंद्व समास 2] द्विगु समास

3] विभक्ती तत्पुरुष समास 4] अव्ययीभाव समास

26) '<u>यथाप्रमाण</u> गती असावी.' या वाक्यातील अधोरेखित सामासिक शब्दाचा समास आहे .....

1] विभक्ती तत्पुरुषसमास 2] अव्ययीभाव समास

3] द्वंद्व समास 4] द्विगु समास

## विभाग क : साहित्य : गुण 20

<u>प्रश्न क्रमांक 27 ते 38</u> – या गद्य पाठावरील <u>12 पैकी कोणत्याही 10 प्रश्नांची उत्तरे</u> द्या. **(10)**

27) जीवन अर्थपूर्ण होईल, जर .......

1] वाहन वापरले तर.

2] गरज नसताही वाहन वापरले तर

3] वाहनाचा वेग आटोक्यात ठेवला तर

4] अत्यावश्यक कामासाठी वाहन नाही वापरले तर

28) जीवन विभागणारे घटक म्हणजे ......

1] जन्म व मृत्यू 2] स्थिती व गती
3] तरुणपण व म्हातारपण 4] आरोग्य आणि अनारोग्य

29) विचारांची गती म्हणजे ......
1] प्रगती 2] अधोगती
3] दिशा नसलेली गती 4] आवेग

30) वाहन उपयोगी पडते .........
1] दुसऱ्यांना रुबाब दाखवण्यासाठी 2] केवळ वेळ वाचवण्यासाठी
3] पैसा वाचवण्यासाठी 4] वेळ व श्रम वाचवण्यासाठी

31)लेखक शिवाजीराव भोसले सांगतात, भावविवश होऊन .....
1] निर्णय देऊ नये. 2] काम करू नये.
3] वाहनावर स्वार होऊ नये. 4] वेगवश होऊ नये.

32) यथाप्रमाण गती ही गरज, पण अनावश्यक गती म्हणजे ...
1] विकृती. 2] अर्थपूर्ण जीवन
3] आपले कर्तव्य 4] प्रगती

33) सौंदर्य पाहणाऱ्याच्या नजरेत तसा आनंद, ........
1] पानांफुलांत 2] पैसा मिळवण्यात
3] आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत 4] चित्रपट पाहण्यात

34) शरीर व मन यांना जोडणारा सेतू .......
1] श्वास 2] जेवण
3] हृदयाची धडधड 4] मेंदू

35)'आयुष्य ... आनंदाचा उत्सव' – या लेखाचे लेखक आहेत ...
1] शिवाजीराव भोसले
2] वसंत आबाजी डहाके
3] श्री. कृ. खाडिलकर
4] शिवराज गोर्ले

36) पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे, ते सांगा ...
1] पैशाने आनंद विकत घेता येतो.
2] आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच.
3] पोटापाण्यासाठी उद्योग तसा आनंदासाठी छंद.
4] शास्त्रीय संगीत ही आनंदाची इस्टेट.

37) आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात, मग ......
1] माणसे वेगावर स्वार होतात.
2] माणसे रस्त्यावर धावतात.
3] वाहने माणसांवर स्वार होतात.
4] रस्त्यावर अपघात होतात.

38) आनंद जितका सहजपणे घ्याल तितका तो .......
1] हातातून निसटतो. 2] हुलकावण्या देतो.
3] दडून बसतो. 4] सहजपणे मिळतो.

<u>प्रश्न क्रमांक 31 ते 42</u> – या पद्य पाठावरील <u>12 पैकी कोणत्याही 10 प्रश्नांची</u> उत्तरे द्या. **(10)**

39) 'रोज मातीत ..' या कवितेत वर्णन आहे .......
1] स्त्रीच्या महानतेचे 2] शेतकरी स्त्रीच्या कष्टमय जीवनाचे
3] स्त्रीच्या स्वतंत्र वृत्तीचे 4] स्त्रियांच्या त्यागमय जीवनाचे

40) पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
शेतकरी स्त्री झेंडूची फुले तोडते, तेव्हा .....
1] देह तोडते 2] सोन्याची फुले तोडते
3] घरादाराला तोरण बांधते 4] त्या रोपांना दुखावते.

41)शेतकरी स्त्री ' हिरवी होऊन मागं उरते' , म्हणजे ....
1] हिरव्यागार शेतात काम करत राहते.
2] शेतात कष्ट करून शेतातील हिरव्या पिकांच्या रूपाने मागे उरते.

3] उन्हात काम केल्याने तिचा रंग काळा – हिरवा होतो.
4] ती स्त्री उसाचं बेणं जमिनीत दाबते.

42)शेतकरी स्त्री सरी-वाफ्यात कांदा लावते, तेव्हा कांदाच नव्हे तर जणू .......
1] आपला जीव लावते. 2] कांड्याकांड्याने संसार सांधते.
3] उन्हातान्हात मरते. 4] मातीत नांदते.

43)शेतकरी स्त्रीबाबतीत कोणते विधान बरोबर नाही ?
1] स्वतःच्या जीवाची पर्वा करते. 2] काळ्या आईला हिरवं गोंदते.
3] रोज उन्हांत मरते. . 4] बियाणांसोबत आपलं मन जमिनीत दाबते.

44)'रे थांब जरा .. आषाढ घना' या कवितेचे कवी आहेत ....
1] ब. भ. बोरकर 2] बालकवी .
3] कल्पना दुधाळ 4] कुसुमाग्रज

45)'रे थांब जरा... आषाढघना' या कवितेत कवीने आकाशासाठी शब्द योजला आहे .....
1] आभाळ 2] नभ
3] वासरमणी-घर 4] इंद्रनीळ

46) कवी आषाढातील मेघांना थांबायला सांगत आहे, कारण .......
1] या आषाढघनांमुळे निर्माण झालेले निसर्गसौंदर्य डोळे भरून पहायचे आहे.
2] या आषाढातील पावसाचा कंटाळा आला आहे.
3] आषाढातील पाऊस थांबला तर शेतातील कामे करता येतील.
4] हे आषाढघन थांबले नाहीत तर पूर येईल.

47)'रे थांब जरा .. आषाढ घना' या कवितेचा आशय आहे ......
1] सामाजिक 2] निसर्गवर्णन
3] काल्पनिक 4] देशभक्ती

48) कवी बोरकरांनी वर्णिलेली '...कोमल पाचूची शेते' म्हणजे .....
1] वेळूची बेटे 2] फुललेला चाफा
3] फुलपाखरांचे पंख 4] शेतातील पिके

49)पुढीलपैकी चूक असलेले विधान कोणते ते सांगा ....
आषाढघनाने घडीभर उघडीप घेतली तर .......
1] सूर्याचे घर मोकळे होईल.
2] पिवळे कोवळे ऊन धरतीवर येईल.
3] काजवे चमचमणार नाहीत.
4] फुलांचा देठ अलवार मधाने भरेल.

50) शेतकरी स्त्री म्हणते, "रोज मातीत, मी गं नांदते" म्हणजे ....
1] ती शेतात उन्हातान्हात जन्मभर राबते.
2] ती कांदा – उसाची लावणी करते.
3] तिचे घर–परिवार शेतातच आहे.
4] ती खोल विहिरीचे पाणी शेंदते .

XXXXXXXX